# पार्वतीपते, हर हर महादेव !

## गोमंतकांतील श्री मंगेश

१९६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू प्रवास
सं क्र. ४११





REFBK-0012993

७५५८५
२२/३/७९
५१९

सांस्कृतिक महाराष्ट्र ग्रंथ-माला : १४

# पार्वतीपते! हरहर महादेव

## गोमंतकांतील श्रीमंगेश

" श्रीशंभो, हर शंकरेश्वर विभो देवाधिदेवा प्रभो ।
गौरीनाथ ॰रेश्य भोगिवलय श्रीकण्ठशर्वाप्रभो ।
शूलिन् ॰ह्र ग॰ कर्पूरगौरागर ।
ब्रह्माद्य ।॰ ॰रोंसी ॰ सं ॰ मला उद्धर ॥ "

केलेलें आहे.

घेतले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२५५२
संग्रहालय

वासुदेव लक्ष्मण वझे

किंमत
६२
नये पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलानंतर
क्रमांक ७५५८५ दि. २२/३/७९
५१९

REFBK-0012993

पनी पब्लिशर्स
टेड, मुंबई २.

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : १४
श्री : १०९ : २ [ ११-६२ ]
© १९६२
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति दुसरी
१९६२

किंमत ६२ नये पैसे

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रांचीं
ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं
भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स, प्रा. लि. करितां
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

मुद्रक :
रा. गो. पाटील
ज्ञानेश्वरी प्रेस,
८३८, सदाशिव, पुणें २.


# पार्वतीपते ! हरहर महादेव

९८२

गोमंतकांत जाऊन जर श्रीमंगेशाचें दर्शन घेतलें नाहीं तर भूवैकुंठ पंढरीस जाऊन विठेवरचा पांडुरंग, विजापुरला जाऊन गोलघुमट किंवा आग्र्यास जाऊन ताजमहाल न पाहण्यासारखें आहे !

पुण्यभूमि गोमंतकांत जीं अनेक प्रेक्षणीय स्थळें आहेत त्यांपैकींच ही छोटीशी टुमदार मांगिरीश नगरी होय. या देवस्थानच्या आजूबाजूला डोंगरांनीं कडें केलेलें आहे. जणूं या देवस्थानाच्या संरक्षणाची सारी हमी यांनींच घेतलेली आहे. आसमंतात वाहणारे झुळझुळ झरे, वनपुष्पांचा सुवास, पक्ष्यांचा किलबिलाट, ती गर्द झाडी आणि नवश्रीनें आपल्या अंगावर घेतलेली हिरवी पैठणी या साऱ्या अनुभवानें मन हरखतें. मूर्तिमंत सृष्टिदेवता समोर उभी राहते.

सायंकाळच्या वेळीं या मंदिराच्या दीपस्तंभावर चढून आजूबाजूला देखावा पाहण्यासारखा असतो. सूर्य अस्ताचलाला जात असतां तो पश्चिम समुद्राच्या बाजूनें जेव्हां कलतो त्या वेळची ती सागरावरील लाटांची मालिका लांबच्यालांब सुवर्णाच्या चकचकीत लगडी घेऊन तर पश्चिमेच्या कांठाकडे येत नाहीं ना असें वाटतें. सूर्य आपल्या किरणांनीं आकाशांतील गंधर्वनगराला क्षणोक्षणीं निरनिराळे रंग देत असतो. याचवेळीं आपल्या निवासस्थानाकडे आकाशपंथानें चाललेली शुभ्र बलाकमालिका त्या बाजूनें जावी म्हणजे तर या गंधर्वनगराची शोभा अधिकच खुलते. त्यांत संध्याकाळच्या सनईचा मंजुळ स्वर, थंड व सुगंधित वायुलहरी, भक्तमंडळीचें येणें जाणें, दिव्यांचा लखलखाट इत्यादि शोभा पाहून कोणाचेंहि मन प्रफुल्लित झाल्याशिवाय राहणार नाहीं.



श्री मांगिरीशमंदिर


श्रीसंस्थान मंगेश

श्रीमंगेशाचें देऊळ पाहावयाचें नाहीं म्हटलें तरी दृष्टीस पडतें. रेल्वेंतून मडगांवांस उतरल्यावर गोव्याची राजधानी पणजीकडे जी मोटार जाते ती मंगेशीच्या महाद्वारावरूनच. मडगांवहून मोटार सुटली कीं, बोरीच्या पुलावरून ती गोमंतकाचें केंद्र फोंडा येथें येते. तिथून फर्मागुडी, म्हाडदोळ आणि म्हाडदोळहून फलींग दीडफलींगाच्या अंतरावरच श्रीमंगेश लागेल. तिथें मोटार आल्यावर डाव्या बाजूला एक मोठी कमान आहे. त्या कमानीवर ‘ श्रीसंस्थान मंगेश ’ असें लिहिलेलें आढळेल. त्या कमानीच्या आंत प्रवेश करतांच सज्जनांच्या स्वभावाप्रमाणें सरळ असा सिमेंटचा रस्ता लागेल. त्या रस्त्यानें सरळ चालत राहावयाचें. दुसरीकडे डावीउजवीकडे वळावयाचें म्हटलें तरी रस्त्याच्या बाजूचे कमरेपर्यंतचे उंच कठडे तसें करूंच देणार नाहींत. कदाचित् रस्त्याच्या बाजूचीं नारळाचीं झाडें आपल्या झांपांच्या हातांनीं बाजारपेठेंतील दुकानादारांप्रमाणें आपल्याला बोलावतील. पण त्यांकडे पाहायचें फक्त आणि पुढें जायचें. डाव्या बाजूला एका पारावर मारुतिराय उभे असतील. त्यांना ‘ जयबजरंग ’ म्हणून नमस्कार करावयाचा. पुढें छोटासा ओढा पाण्याच्या खळबळीनें श्रीमंगेशाचें देऊळ जवळ आल्याचें सांगेल. ओढा ओलांडतांच डाव्या हातालाच एक तलाव लागेल. हा तलाव म्हणजे आजूबाजूंच्या माडांचा आरसाच जणूं.

तलावांतील छोट्या लाटा एका कांठापासून दुसऱ्या कांठाकडे धांव घेतात व तिथें क्षणभर थांबून पुन्हां पहिल्या कांठाशीं हजर होतात. ही त्यांची जाऱ्ये पाहिल्यावर असें वाटतें कीं, या लहरी म्हणजे दोन्ही कांठांनीं परस्परांना संदेश पोंचविण्याकरितां नियुक्त केलेल्या अल्लड बालिकाच. त्या पाण्यावर आट्याटयांचा खेळ खेळूं लागल्या म्हणजे नारळींच्या प्रतिबिंबासह पाणी हलूं लागतें. मग मात्र पाहणारा माणूस क्षणभर घाबरून दचकतो. कारण नारळींच्या झाडांचें प्रतिबिंब

पाण्याबरोबर हालल्यानें पाण्यांत असें दिसतें कीं, पाण्यांत मोठमोठे अजगर पडलेले असावेत; आणि कांठावर येण्याकरितां त्यांची सारखी धडपड चालू असावी !

हा तलावाचा देखावा पाहून झाल्यावर जरा डाव्या बाजूला वळतांच १०-१२ पायऱ्या वर चढून गेल्यावर मंदिराच्या आवाराचें प्रवेशद्वार लागेल. त्या मंदिरासमोरच नगारखाना आहे. येथें तीनत्रिकाळ सनईच्या सुस्वर स्वराशीं संवाद करणारा चौघडा झडत असतो.



श्रीमंगेशाचें देवालय

श्रीमंगेशाच्या विशाल प्रांगणामध्यें प्रवेश करतांच प्रांगणाच्या मध्यभागीं देवालयाची भव्य इमारत, दीपस्तंभ आणि चोहोंबाजूंनीं पसरलेल्या भजकांना रहाण्याकरितां बांधलेल्या विशाल अग्रशाला. या अग्रशाला म्हणजे मंदिराचे संरक्षक भरभक्कम तटच. त्या चारहि विस्तीर्ण अग्रशाळा भक्तजनांनीं फुलून गेलेल्या दिसतील. प्रवेशद्वाराच्या अगदीं समीपच उजव्या बाजूनें एक किराणा मालाचें दुकान आहे. येथून देवाची भूळभेट, म्हणजे प्रथम भेटीस लागणारें नारळ, केळीं, विडे

आणि अन्य देवकृत्यास लागणारा किराणा माल पुरविला जातो. देवालयाच्या उजव्या बाजूनें 'कमिटीची' कचेरी आहे. या ठिकाणीं संस्थानचे कमाविसदार कायम असतात. देवाच्या मागच्या बाजूला विहीर आहे. याच विहिरीचें पाणी अभिषेकास वापरलें जातें. या आवारांत प्रवेश केल्यावरच आपण कोणत्यातरी राजवाड्याच्या प्रांगणांत प्रवेश केल्यासारखें वाटतें. मंदिराचें उंच शिखर कोणत्या अभिलाषानें गगनाच्या पोटीं झेपावत असेल बरें! सह्याद्रीच्या उत्तुंगतेबरोबर तर त्याला पैजा जिंकायच्या नाहींत ना? शिखरावरील कळस तर पंचाग्निसाधन केलेला तपस्वी जसा सूर्यबिंबाकडे रोखून पहातो त्याचप्रमाणें सूर्याकडे पहात आहे. मनाची धांपकांप जिरून, दुजेपणा निमाल्यावर एखाद्या योग्यानें जशी स्वात्मप्रकाश-मंदिराचीं द्वारें खुलीं करून समाधीच्या आनंदांत अचळ रहावें, त्याचप्रमाणें नाहीं का हा दीपस्तंभ दिसत?

कुबेराचें वैभव :

आठ-दहा पायऱ्या चढून मंदिराच्या आंत गेल्यावर आंतील भागाचें नेत्राकर्षक दृश्य डोळ्यांना आपल्याकडे आकर्षून घेईल. जांभळ्या, पांढऱ्या आणि हिरव्या रंगाच्या हंड्यांनीं मध्यभागाच्या झुंबराला कसा वेढा दिला आहे. त्यांत गोल आकारांच्या रंगीबेरंगी हंड्यांनीं तर मोक्याच्याच जागा पकडलेल्या आहेत. बिचाऱ्या झुंबराची कोंडीच केली आहे त्यांनीं. सभागृहाच्या स्वच्छ फरशीवर उभारलेले भव्य खांब, खांबावरील कमानी, कमानीवर सुंदर नक्षीकाम केलेली पटई, त्या पटईला टांगलेलीं हंड्या-झुंबरें, जमिनीवर चार चार फूट उंचीच्या मोठमोठ्या परातींत ठेवलेल्या समया, चांदीचे चकचकीत दरवाजे आणि कमानी, त्याचप्रमाणें चांदीचींच घंगाळें, ताटें, वाट्या, गुढ्यातोरणांच्या काठ्या, असें हें नेत्रदीपक वैभव पाहिल्यावर कुबेराचा सखा शंकर, असें जें न पटण्यासारखें सांगण्यांत येतें तें इथें मात्र पटल्याशिवाय रहात नाहीं.

सभागृहांतच या वैभवला शोभेल असा श्रीनंदिकेश्वर एक पाय जरा पुढें करून मोठ्या डौलानें बसलेला आहे. त्याच्या शेजारींच समोर श्रीमंगेशसन्मुख अशी एक लहानशी काळ्या दगडाची बैठी मूर्ति आहे. मूर्तिशेजारीं भाविक लोक एकसारखे त्या मूर्तीकडे टक लावून पहात बसलेले दिसतील. शेजारीं पाटावर सोवळें नेसून बसलेले भटजी त्या मूर्तीला उद्देशून कांहींतरी बोलत असतील. काय व कशाकरितां बरें ही विनवणी चाललेली आहे? पहाच—त्या मूर्तीच्या अंगाला कसल्या तरी फुलांच्या लाल लाल कलिका लावलेल्या आहेत. याला 'कौल' असें म्हणतात. कळी झडली म्हणजे तिचे ठराविक संकेत आहेत. त्या संकेताप्रमाणें देवाला विनंती केलेल्या मजकुराची इष्टानिष्टता ठरवतात. या मूर्तीला ग्रामपुरुष अथवा वत्सगोड्यांचा कुलपुरुष असें म्हणतात. या मूर्तीच्या लगतच एक दरवाजा, त्या दरवाज्याच्या आंत पुन्हां प्रदक्षिणेचा मार्ग, त्याच्यापुढें गाभारा, गाभाऱ्यामध्यें दीपमालिकेच्या आडव्या-उभ्या रांगा, आणि त्या रांगेंत श्रीमंगेशाचा शांत मुखवटा दिसेल. अभिषेक चालू असतांना हा मुखवटा घातलेला नसतो. महालिंगावर पाण्यानें भरलेलें अभिषेकपात्र असेल. महालिंग हेंहि पण सुंदर आहे.


मुखवटा घातलेली श्रीमंगेशाची मूर्ति

सभागृहांत (चौकांत) उजव्या बाजूस विघ्नहर्त्या गजाननाची मूर्ति आणि डाव्या

बाजूस श्रीभगवतीदेवीची मूर्ति आहे. मंदिराच्या मागच्या बाजूनें श्रीमुळकेश्वर, त्याच्या उजवीकडे श्रीलक्ष्मीनारायण, श्रीसूर्यनारायण, गरुड, वीरभद्र, श्रीसांतेरी, पूर्व बाजूनें कालभैरव, प्राकाराच्या उजव्या बाजूनें कौंडिण्य गोत्राचा कुलपुरुष आणि तळाच्या उजव्या बाजूनें श्रीशांतादुर्गा व समोरच क्षेत्रपाल इत्यादि देवतांचीं छोटीं छोटीं मंदिरें आहेत.

पूर्वेतिहास ·

परशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली आणि रत्नांनीं भरलेल्या पृथ्वीचें दान कश्यपऋषींना दिलें. आपणच दान दिलेल्या पृथ्वींत रहावें हें मानी परशुरामाला बरें वाटेना. त्यानें आर्यावर्तापासून सह्याद्रीकडे प्रयाण केलें आणि सह्याद्रीच्या पश्चिमेस येऊन समुद्रापासून चारशें कोस लांब व बारा कोस रुंद अशी सुपाच्या आकाराची भूमी घेतली. तोच शूर्पारक देश म्हणजेच हल्लींचें कोंकण.

या कोंकणांत परशुराम राहूं लागला. नवीन वसविलेल्या प्रदेशांत ज्या ब्राह्मणांची त्यानें संभावना केली त्यांच्याकडून परशुरामाचा उपमर्द झाला. तेव्हां परशुरामाला राग आला. तो उत्तर कोंकणांत आला आणि त्यानें चित्तपावन ब्राह्मणांना निर्माण केलें. त्यांच्याकडून हि कांहीं प्रमाद घडला, म्हणून परशुराम थेट सरस्वतीतीरावरून गौड देशांतील त्रिहोत्रपूर ( तिरहुत ) येथें आला आणि तेथून त्यानें दशगोत्राचे ब्राह्मण आणले.

भारद्वाज कौशिकश्च वत्सकौंडिण्यकश्यपाः ।
वसिष्ठो जमदग्निश्च विश्वामित्रश्च गौतमः ॥
अत्रिश्च दशऋषयः स्थापितास्तत्र एव ही ।
श्राद्धार्थं चैव यज्ञार्थं भोजनार्थं च कारणात् ॥

तीं दशगोत्रें म्हणजे अशीं : भारद्वाज, कौशिक, वत्स, कौंडिण्य,

कश्यप, वसिष्ठ, जमदग्नि, विश्वामित्र, गौतम आणि अत्रि. या ब्राह्मणांचीं सहासष्ट कुळें होतीं. आपल्याबरोबर त्यांनीं आपापलीं कुळदैवतेंहि आणलीं होतीं.

मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्च म्हालसा ।
शांतादुर्गाच नागेश: सप्तकोटीश्वर: शुभ: ॥

सहासष्ट कुटुंबापैकीं ज्यांना जो गांव अग्रहार मिळाला तिथें त्यांनीं वस्ती करून आपापल्या कुळदैवतांची स्थापना केली.

त्यांपैकीं वत्स आणि कौंडिण्य गोत्रांच्या ब्राह्मणांस अघाशी नदीच्या जवळील कुशस्थळी ( कुडथाळ ) हा अग्रहार मिळाल्यामुळें तेथें त्यांचें कुलदैवत श्रीमंगेश या देवाची स्थापना झाली.

अतिपूर्वकथा ·

ब्रह्मदेवांना सृष्टि निर्माण केल्यावर मोठा गर्व झाला. हें शंकरांनीं जाणलें आणि ब्रह्मदेवांचा गर्व नाहींसा करण्याकरितां प्रलय करून ब्रह्मदेवांनीं उत्पन्न केलेल्या सृष्टीचा विध्वंस करावा असा क्रम चालू झाला. तेव्हां त्रिहोत्रपूरच्या मांगिरीश पर्वतावर ( मोंगीरपर्वत ) ब्रह्मदेवांनीं शंकरांची आराधना केली. बऱ्याच कालानें शंकर प्रसन्न झाले आणि म्हणाले, " ब्रह्मदेवा, तुला झालेल्या गर्वाचा समूळ उच्छेद करावा हा माझा प्रलयामागचा हेतु होता. आतां तूं तुझा गर्व टाकून दिला आहेस, त्यामुळें मला प्रलय करण्याचें कारण नाहीं. "

ब्रह्मदेवांनीं याच पर्वतावर एक शिवलिंग स्थापन केलें. तेंच मंगेश होय.

मांगिरीश पर्वतो नाम पूर्वदेशे त्रिहोत्रके ।
ब्रह्मणा स्थापित लिंग पूर्वं तत्र द्विजोत्तम ॥

हें लिंग तिथें स्थापन केल्यावर त्या स्थळाचें माहात्म्य वाढलें. भक्त लोक जमा झाले आणि त्रिहोत्रपूर भक्तिरसाचें सरोवर बनलें. तेथूनच हे महादेव ( मंगेश ) वत्स व कौशिक घराण्यांबरोबर गोमंतकांत आघाशीच्या तीरावर कुशस्थळीला आले.

गोमंतकांत या ब्राह्मणांची वसाहत होऊन बराच काळ लोटल्यावर याच सारस्वत ब्राह्मणांचें एक मोठें कुटुंब श्रीरामेश्वराची दक्षिण यात्रा करत करत गोमंतकांत आलें. तेथेंच त्या कुटुंबास कांहीं ईश्वरी साक्षात्कार झाल्यामुळें त्या कुटुंबानें आपला जो देश ' कान्यकुब्ज ' तिथें जाण्याचें रहित करून गोमंतकांतच हें कुटुंब राहिलें आणि या समाजांत तें मिसळून गेलें. या कुटुंबांतील देवशर्मा हा प्रमुख होता. याचें गोत्र वत्स होतें.

एक साक्षात्कार आणि मुळकेश्वर


श्रीमांगिरीश देवाची कुशस्थळींत स्थापना झाल्यावर कांहीं काळानें एक चमत्कार घडला. तिथें एका शिवशर्मा नांवाच्या ब्राह्मणाची एक गाय होती. ती रानांत चरायला गेली म्हणजे आपली दुधानें भरलेली कास रिकामी करी. असा प्रकार रोज होई. एक दिवस देवशर्मा नांवाच्या गुराख्यानें या गाईवर पाळत ठेवली. दुपार झाल्याबरोबर ही कपिला एका दाट झाडींत शिरली. तिच्या मागोमाग हा देवशर्माहि गेला. गाय तिथें गेली आणि आंचळांतील दूध त्या झाडींत असलेल्या दिव्य शिवलिंगावर सोडूं लागली.

संध्याकाळीं घडलेला प्रकार देवशर्म्यानें शिवशर्म्यास सांगितला. शिवशर्मा श्रीमांगिरीशाचा अनन्य भक्त होता. तो त्या ठिकाणीं गेला आणि त्या शिवलिंगाचें त्यानें दर्शन घेतलें. पहिल्याच रात्रीं शिवशर्म्याला श्रीमांगिरीशाचा दृष्टान्त झाला होता कीं, ' माझें वास्तव्य ह्या शेजारच्या वनांतच आहे. ' या साक्षात्काराप्रमाणें श्रीमांगिरीश म्हणूनच तेथील लोक या शिवलिंगाची पूजाअर्चा करून अनन्यभावानें या श्रीमंगेशाला भजूं लागले. ज्या देवशर्मा नांवाच्या गुराखी मुलानें प्रथम श्रीमांगिरीशाचा शोध लावला तोच श्रीमंगेशामागील मुळकेश्वर. देवाचें प्रथम दर्शन झाल्यानें तो गुराखीहि आज देव बनला आहे.

## मांगिरीशाचा मांगिश आणि मांगिशाचा मंगेश

श्रीशंकर बराच काल कुशस्थळींत येऊन राहिले. श्रीशंकर कोठें गेले हें पार्वतीला सुद्धां समजलें नाहीं. मग आपल्या पतीच्या शोधाकरितां पार्वती निघाली. हिमालयांतील गिरिकंदरांत तिनें शंकरांना पाहिलें, सर्व नद्यांचे तीर पालथे घातले, पण कांहीं पत्ता लागेना. शेवटीं पार्वतीला कोठून तरी कुणकुण लागली कीं आपले पति गोमंचलाजवळील अघाशीतीरावर गुप्तपणें वास करीत आहेत.

ती तिथें आली आणि अतिशय उग्रतर अशा तपश्चर्येला तिनें प्रारंभ केला. कडकडीत तपश्चर्येनें पार्वतीचा देह अगदीं क्षीण झाला. शंकरांना आपल्या प्रियेची करुण दशा पहावेना. त्यांनीं तिला दर्शन देण्याचें ठरविलें. मात्र मनांत असा एक विचार आला कीं, दर्शन देण्यापूर्वी तिची जरा गम्मत करावी. म्हणून शंकरांनीं महाव्याघ्राचें रूप धारण केलें. पार्वतीच्या समोर येऊन आपला अक्राळविक्राळ जबडा पसरून आपल्या नखांनीं जमीन ओरबडीत आणि शेपटीनें जमीन धोपटीत एकामागून एक अशा डरकाळ्या तो व्याघ्र फोडूं लागला. आपल्या दैवी शक्तीच्या जोरावर पार्वतीनें या वाघाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. पण हा वाघ काय सामान्य होता! खरोखरच पंचानन पंचाननाच्या रूपानें अवतीर्ण झाला होता. मग मात्र भयानें



श्रीमुळकेश्वर

पार्वतीच्या पोटांत गोळा उठला. ती थरथर कांपूं लागली आणि गिरीशाला म्हणजे शंकराला हाक मारून 'हे गिरीश मां त्राहि' (म्हणजे--हे गिरीशा, शंकरा, माझें रक्षण कर) असा शंकरांचा धांवा करूं लागली.

वाल्मीकीचा 'राम' शब्द जसा प्रथम प्रथम उलटा होत असे तसेंच भयामुळें पार्वतीचें वाक्य उलटसुलट होऊं लागलें. 'हे गिरीश मां त्राहि' करतां करतां या वाक्यांतील 'हे' आणि 'त्राहि' यांचा लोप होऊन मग राहिलीं 'मांगिरीश' एवढींच अक्षरें. याच्यामध्येंहि फरक होऊन 'मां गिरीश'चे, 'मांगिश' हेच शब्द तिच्या तोंडांत शिल्लक राहिले.

त्याचवेळीं शंकरांनीं व्याघ्ररूप टाकून देऊन आपलें खरें दर्शन पार्वतीला दिलें. पार्वतीला दर्शन देऊन शंकरांनीं सांगितलें, "प्रिये, मी तुझ्या तपानें प्रसन्न झालों आहें. काय पाहिजे असेल तें मागून घे." पार्वती म्हणाली, "नाथ, भयानें माझ्या तोंडून 'मां गिरीश' या शब्दाऐवजी 'मांगिश' असें तुमचें नांव निघालें, त्याच नांवानें आपण प्रसिद्ध व्हावें म्हणजे या वाघाच्या प्रसंगाची स्मृति मला कायम राहील." श्रीशंकरांनीं 'तथास्तु' म्हटलें आणि पार्वतीसह अघाशी नदीच्या तीरावर श्रीमांगिश हें नांव धारण करून ते राहिले. या मांगिशाचेंच पुढें 'मंगेश' हें नांव झालें.

### बाटाबाटी आणि स्थलांतर'

१५१० च्या २७ फेब्रुवारींत गोमंतकाला फिरंग्याचे पांढरे पाय लागले. सुरवातीस त्यांनीं आपलें राज्य सुखावह वाटण्याकरितां गोमंतकांतील प्रजाजनांना पुष्कळच राजकीय आणि धार्मिक सवलती दिल्या आणि हळूहळू करून अजगराप्रमाणें सर्व गोवा आपल्या उदरांत घातला. सुजला, सुफला भूमि ताब्यांत आली तरी गोमंतकीय जनता धर्मानें निराळीच होती. हिंदु धर्मांत असलेल्या कांहीं भोळ्या

समजुती, आपसांतील हेवेदावे, जातिमत्सर इत्यादि गोष्टींचा पोर्तुगिजांनीं फायदा घेतला.

जेथें फिरंग्याचा स्पर्श म्हणजे अस्पृश्यता, ती स्नानावांचून जात नव्हती, तेथें रोटी-बेटी व्यवहार कुठून होणार ? शाब्दिक प्रचारानें आणि कोणत्याहि आमिषानें हिंदु बाटेना, तेव्हां जुलमानें हिंदु लोकांच्या बायका पकडून पोर्तुगिज शिपायांबरोबर त्यांचीं लग्नें लावून देण्याचा सपाटा सुरू झाला. शस्त्राच्या बलावर धर्मप्रसार होऊं लागला. भयानें बरेचसे हिंदु बाटले गेले.

१५४६ सांत हिंदु लोकांच्या मूर्तिपूजेस अडथळे आणणें, उत्सव करण्याची बंदी करणें अशा प्रकारें छळास प्रारंभ झाला. आणि जबरदस्तीनें गोवा बेटावरील दिवाडी, चोडण येथील लोकांस ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली गेली.

१५६० मध्यें गोव्याला ख्रिस्ती धर्मोपदेशक ‘ गास्पार ’ नांवाचा पाद्री आला. त्यानें पहिल्या फेरीस व्यापाराच्या निमित्तानें गोवें शहरीं आलेल्या सासष्टींतील ४०९ लोकांस पकडून एकाच दिवसांत ख्रिस्ती बनविलें.

पुढें पुढें या धर्मवेड्या पाद्री मर्कटांना पोर्तुगिज सरकारकडून सत्तेचें माजवण मिळत गेलें. ज्या ठिकाणीं हे पाद्री हिंदूंना बाटवण्याकरितां जात त्यांच्यामागें पोर्तुगिजांचें आरमार त्यांच्या रक्षणाकरितां उभें राहूं लागलें. हिंदूंचीं देवळें कोमळूं लागलीं. अंगणांतील तुळसीवृंदावनाच्या जागीं क्रूस दिसायला लागले. आणि समयांची जागा मेणबत्त्यांनीं घेतली. हिंदूंच्या देवता फिरंग्यांच्या म्युझियममध्यें दाखल झाल्या.

पुढें कांहीं कालानंतर फिरंगी सरकारला दुसरीकडे लढाईस तोंड द्यावें लागलें, ही संधि साधून कांहीं हिंदूंनीं मोडलेलीं देवळें दुरुस्त करून घेतलीं. आणि मंदिराच्या आसपास असलेलीं ख्रिस्तालयें

मोडून टाकलीं. हें त्यांचें कृत्य शमलेल्या आगींत तेल ओतण्यासारखें झालें. ही बातमी पाद्री लोकांना समजली. सामष्टींतील हिंदूंच्या पारिपत्यासाठीं लढाऊ गलबतांनीं सासष्टीवर तोफा डागल्या. तोफगोळ्यांनीं हिंदूंचीं देवालयें पुन्हां जमिनीला मिळालीं आणि ख्रिस्तीकरणाचा वणवा जोरानें पेटला.

केवळ पावाचा तुकडा घराच्या कौलावर अथवा विहिरींत पडल्यावरच सनातन अविनाशी हिंदु धर्मतत्त्वें विटाळूं लागलीं! ज्यांच्या घराच्या कौलांना अथवा विहिरीच्या पाण्याला पाद्र्याच्या हातचा पाव लागला तीं कुटुंबेंच्या कुटुंबें ख्रिस्ताच्या कृपेला पात्र ठरून जातिबाह्य ठरविण्यांत आलीं! आणि या भोळ्या चुकीचा परिणाम आज अर्धा गोमंतक ख्रिस्ती बनण्यांत झाला!

कुडथाळीला श्रीमंगेशाचें देवालय होतें. तिथें १५६० सालीं अशी एक घटना झाली कीं, पाद्री पेरूकुलास हा एकदां कुठाळ येथें आला आणि त्यानें मृत्युपंथास लागलेल्या एका हिंदूला बाप्तिस्मा दिला. त्यामुळें तेथील हिंदु लोक खवळले आणि त्या पाद्र्याला त्यांनीं हद्दपार केलें. एवढेंच नव्हे तर त्या रागाच्या भरांत तेथील एका पोर्तुगिज नोकराचा खून करून एक नवीनच बांधलेलें चर्चहि मोडून टाकलें. या कृत्यामुळें पुढें सगळ्या सासष्टीवर बाटाबाटीचा वरवंटा लवकरच फिरला.

कुडथाळींत जेव्हां ही धाड आली त्या आणीबाणीच्या प्रसंगीं कुडथाळकरांनीं श्रीमंगेशाचें शिवलिंग होडींत घालून विजापूरकरांच्या ताब्यांतील पैलतीर गांठलें आणि प्रियोळ गांवीं श्रीमंगेशाला आणून तेथें त्याची स्थापना केली. त्याचबरोबर छोटेंसें मंदिरहि तेथें बांधलें. प्रथम श्रीमंगेशास आणलें ती जागा आजच्या देवालयाच्या प्राकाराबाहेर दक्षिण बाजूस असून त्या ठिकाणीं आतां तुलसीवृंदावन आहे. या

तुलसीवृंदावनाकडे वर्षांतून एकदां तुलसीविवाहाच्या वेळीं श्रीमंगेशाची पालखी जाते

यानंतर कांहीं काळानें मोठें देवालय बांधण्यांत आलें. पुढें तेंहि जीर्णस्थितीस आलें, म्हणून दुसऱ्यांदा मंदिर बांधलें. तेंच आजचें मंदिर. ह्या नवीन मंदिरास आज अर्ध शतकाहून जास्त काळ लोटला आहे; तथापि तेथील शिल्पकला व इतर सौंदर्य वगैरे देवालयाचीं वैशिष्ट्यें अद्याप तशींच कायम आहेत.

श्रीमंगेशास कुडथाळीहून आणल्यावर मागून मंदिरें फोडणाऱ्या लोकांचीं धाड कुडथाळीवरहि आली. त्यांनीं तेथील देवळें पाडून टाकलीं आणि श्रीमंगेशाच्या देवळावर १५५६ सालीं एक मोठें चर्च बांधण्यांत आलें. आतां त्या जागेवर त्याचे कांहीं अवशेष शिल्लक दिसत नाहींत. तरी थोड्या अंतरावर एक लहानसा तलाव तेवढा दिसतो.

इतिहासांत कुडथाळींत कॅप्टन दियोगु रुद्रिगीस यानें कुडथाळी येथील जीं मंदिरें पाडून टाकलीं त्यांचीं नांवें अशीं आहेत : मंगनाथ ( मंगेश ), सांतेरी, वीर, कपिलेश्वर, नारायण, भगवती, गोपिनाथ आणि चंद्रनाथ.

पावलीनें अभिषेक

प्रियोळ गावीं श्रीमंगेश आल्यापासून या देवस्थानची भरभराट होत गेली. महाराष्ट्र, कर्नाटक इत्यादि ठिकाणाहून श्रीमंगेशाचे भक्त दर्शनास येऊं लागले. दर्शनास येणाऱ्या भक्तांच्या मनांत कांहीं कामना असतातच. त्यांच्या परिपूर्तेसाठीं देवाच्याजवळ भक्त प्रार्थना करतात.

असेच एक संसारतापानें पोळलेले आणि दारिद्र्याला कंटाळलेले सावंतवाडी संस्थानांतील आरवली गांवचे कुलकर्णी कुलदेवी श्रीशांतादुर्गा हिच्या दर्शनास कवळें येथें आले. श्रीशांतादुर्गेची सेवा केल्यावर आजोळचें दैवत म्हणून श्रीमंगेशाच्या दर्शनासहि ते मंगेशीं आले. दर्शन झाल्यावर श्रीमंगेशास अभिषेक करावा असें त्यांच्या

मनानें घेतलें; पण खिशांत त्यावेळीं पावलीपेक्षां एक पैदेखील जास्त नव्हती. चार आण्यांत अभिषेक करण्याचें तेथील पुजारी उपाध्यायांनीं नाकारलें. याचें कुलकर्ण्यांना त्यावेळीं फारच वाईट वाटलें. त्यांनीं ती पावली तेथील तुलसीवृंदावनांतच पुरून ठेवली. आणि श्रीमंगेशास वंदन करून ते नोकरीकरितां हिंदुपदपातशाहीचे जें स्थान सातारा शहर त्या ठिकाणीं आले आणि कचेश्वरबाबा अतीतकर यांचे घरीं नोकरीस राहिले.

कचेश्वरबाबांच्या घरीं नोकरीस असतांनाच कामकाजाच्या निमित्तानें बाजीराव पेशवे यांचा त्यांच्याशीं चांगलाच परिचय झाला. यांच्या अंगच्या गुणांची पेशव्यांनीं पारख केली आणि त्यांना आपल्या पदरीं ठेवून घेतलें. पुढें हे आपल्या कर्तबगारीनें पेशवाईत उदयास आले. प्रसिद्ध शिंदेशाहीचे संस्थापक रामचंद्रबाबा मल्हार ते हेच.

रामचंद्रबाबांचें कौशल्य लेखणींतच होतें असें नाहीं तर तें कधीं कधीं तरवारीच्या धारेवरहि चमकत होतें. म्हणून बाजीरावांनीं त्यांस राणोजी शिंद्यांचे दिवाण नेमलें.

राणोजी शिंदे वारल्यावर जयाप्पा शिंदे यांच्या कारकिर्दीतहि आपण दिवाणगिरीचें काम करावें अशी त्यांची फार इच्छा होती. परंतु ती साध्य न झाल्याकारणानें ते पूर्ववत् पेशव्यांच्या दरबारीं काम पाहूं लागले. तेथें त्यांनीं तलवार व लेखणी सारख्याच कुशलतेनें चालविली.

पुढें कांहीं दिवसांनीं रामचंद्रबाबा मल्हार हे गोमंतकांत आले. कवळ्यास कुलदेवी श्रीशांतादुर्गेचें दर्शन घेतलें आणि आजोळचा देव श्रीमंगेश याच्या दर्शनास ते आले. दर्शन घेऊन आल्यावर अभिषेक वगैरे देवकृत्यें करण्यापूर्वीं त्यांनीं महाजन मंडळींची सभा बोलाविली. आपल्या गरिबीच्या स्थितींत पूर्वीं पावलीचा अभिषेक करण्याचें पूजारी उपाध्यायांनीं नाकारल्याची गोष्ट महाजन मंडळींना सांगितली आणि

यापुढें पावलीनेंच अभिषेक करावा असा ठराव करून घेऊन लगेच तुलसीवृंदावनांत पुरून ठेवलेली पावली उकरून काढून तिचा पहिल्यांदा श्रीमंगेशास अभिषेक करविला आणि मगच मोहरांचा अभिषेक रामचंद्रबाबांनीं केला.

ही पावलीनेंच अभिषेक करण्याची प्रथा अद्याप श्रीमंगेश देवस्थानांत चालू आहे.

श्रीमंगेशास रामचंद्रबाबांनीं पेशवे सरकारतर्फे त्यांचे मांडलीक सौंधेकर राजे यांकडून इनाम गांव व वार्षिक अडीचशें रुपयांची नगद नेमणूक करून दिली. या इनामगांवासंबंधीं पेशवे सरकारांतून गोर्तुगीज सरकारला आलेला एक खलिता असा आहे :

| श्री<br>राजा शाहु नरपति<br>हर्षनिधान बाळाजी<br>बाजीराव प्रधान |
|---|

(मुळांत हा शिक्का वाटोळा आहे)

श्री

राजेश्री रामचद्र मल्हार याचे कुलदेवाचीं देवालयें अल्रूज प्रातीं आहेत. तेथील उर्जेस तेल, फुलें आणि द्रव्यें पाहिजेत त्यास खर्चाबद्दल, रफायत पन्हा सदाशिव नाईक, इमडी राजे सौंदे याजकडून कवलेंग्राम श्रीशातादुर्गा देवीस व मौजे प्रियोळ येथील श्रीम्हाळसादेवीस एक वाडा व श्रीमगेश देवास एक वाडा व नगदी महाल मजकुरीं अडीचशें रुपये इनाम सपादून घेऊन सनदी हासल केल्या आहेत, अशास गाव व वाडा मजकुरचीं कमाविशी करून कमाविसदार जातील अशास, इजलाल पन्हाशीं आमचा संकल्प कीं सदरहु गाव, वाडे, देवाल्यें व कमाविसदार यास इजलाल पन्हाकडून काहींच तसोशी होऊ नये. सौंदे सस्थानीं व इजलाल पन्हामध्यें विभक्तता पडली आहे, तेव्हा इजलाल पन्हाकडील इसम यास आज्ञा केली पाहिजे कीं, सदरहु गाव, वाडे, देवाल्यें व कमाविसदार यांस काहींच उपसर्ग करू नये. सौंदे सस्थान यासी पाहिजे तसें वर्तावें परतु यात दिकत असू नये. श्रीसप्तकोटेश्वर क्षेत्र नार्वे हें पुरातनपासून सरक्षिलें आहे. इजलाल पन्हा अगोदरचा विसरै यानीं डिचोली महाल व किल्ला काबीज

केला. ते समयीं गाव फरारी झाल्यामुळें देवालय खालीं आलें. तेव्हा गावाहून श्रीस्थळ काढिलें अशास गाव मजकूर श्रीक्षेत्रास पूर्वीच इनाम देऊन आम्हा-कडून सरकारात पत्र सादर झालेंच आहे प्रस्तुत क्षेत्राची उर्जा चालणेच्या खर्चाबद्दल सदरहू गावचें इनामपत्र इजलाल पऱ्हानीं रवाना केलें पाहिजे. रवाना छ. १८ माहे शाबान ( ११ माहे जून ) जादा काय लिहावें हे विताबत. ( बाळाजी बाजीरावाचा शिक्का )

**गोमंतकांतील सर्व देवस्थानांत या देवस्थानचा क्रमांक पहिला असून दुसरा क्रमांक कवळ्याच्या श्रीशांतादुर्गेचा आहे.**



श्रीशांतादुर्गा देवीची मूर्ति

वार्षिकोत्सव :

येथील वार्षिक उत्सव श्रीमंगेशाच्या महाजनांनीं ठेवलेल्या कायम निधींतून व्याजानें तर कांहींनीं देवाच्या नांवानें आपल्या घराण्यांत राखून ठेवलेल्या जमिनींचें उत्पन्न घेऊन करावयाचे असतात.

त्यापैकीं कांहीं ठराविक उत्सव आहेत : श्रीरामनवमी, अक्षय्य-तृतीया, आषाढ शु. द्वादशी, गोकुळाष्टमी, अनंतचतुर्दशी, नवरात्र-दसरा, कोजागरी, गुरुद्वादशी, दीपावलि कार्तिक शु. द्वादशी, वैकुंठचतुर्दशी, कार्तिक शु. पौर्णिमा-वनभोजन, कार्तिक वद्य ७ मी व ८ मी मत्स्यावतारी काला व दहीकाला. हे उत्सव त्या मानानें लहान प्रमाणावर किरकोळच होतात. परंतु माघांतला उत्सव मुख्य व मोठा असतो.

दरवर्षी माघांत मंगेश देवाची जत्रा भरत असते. या जत्रेला निदान गोमंतकांतील श्रीमंगेशाच्या महाजनांपैकीं प्रत्येक कुटुंबातील एक तरी पुरुष हजर असतो. या उत्सवांत माघ शु. ७ मी पासून रोज श्रीमंगेशाची निरनिराळ्या वाहनांतून मिरवणूक काढतात. ७ मीस विजयरथ, ८ मीस हत्तीवरील अंबारी, ९ मीस रौप्यशिबिका, १० मीस महारुद्र-सांगता भोजन आणि रात्रौ रथांतून मिरवणूक, ११ शीस रौप्यशिबिका, १२ शीस नौकाविहार, १३ शीस सुखासन, १४ शीस छोटा रथ व पौर्णिमेला महारथ. शिवाय या उत्सवांत एकादशीपासून विविध कार्यक्रम होतात.हरिदास, पुराणिक, वादनकार, गवई इत्यादि परगांवचे कलाकार येत असतात. हे लोक देवाच्या पुढें हजेरी देतात. या कलाकारांची येथें योग्य संभावना केली जाते.

सोमवार हा श्रीमंगेशाचा आठवड्यांतील पर्वणीचा दिवस. या दिवशीं रात्रीं शिबिकेंतून श्रीमंगेशाची मिरवणूक निघत असते.

या देवस्थानचें वार्षिक उत्पन्न सुमारें २५ हजारांचें आहे; आणि खर्चाची बाबहि जवळजवळ तेवढीच आहे.

### नित्यक्रम

पहांटे पांच वाजतां चौघडावादन, नंतर पचवाद्यांची नौबत. सकाळीं सहा वाजतां निर्माल्यविसर्जन होतें. दुपारीं अकरा वाजेपर्यंत अभिषेक चालू असतात. या अभिषेकाकरितां देवळांत फारच गर्दी



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

श्रीमंगेश उत्सवमूर्ति

होत असते. रोज तिथें कुणाचे ना कुणाचे महारुद्र चालू असतात. केव्हां केव्हां तर हे तीन दिवसांत होणारे महारुद्र दोनच दिवसांत संपूर्ण करून घ्यावे लागतात.

कोणत्याहि भक्ताला श्रीमंगेशास महारुद्र करावयाची इच्छा झाल्यास आपण महारुद्र करणार असल्याचें कमिटीस कळवावें लागतें आणि याची नोंद झाल्यावर सुमारें वर्ष दीड वर्षानें क्रमांक लागून महारुद्र करण्याची संधि मिळते !

दुपारीं ११ वाजतां पुन्हां चौघडा, १२ वाजतां नैवेद्यसमर्पण आणि महाआरती, संध्याकाळीं ६ वाजतां प्रदोषपूजा, चौघडावादन, नंतर पंचवाद्यांची नौबत. रात्रौ ७॥ ला पुराण, ८॥ ला कीर्तन आणि ९॥ ला महाआरती, मंत्रपुष्प. भक्तजनाच्या कल्याणार्थ प्रार्थना व प्रसादप्रदान होऊन नित्यक्रम संपतो.

नोकरवर्ग

देवस्थानांत काम करण्यासाठीं उपाध्याय, पुजारी, घसास, (गाभाऱ्याबाहेरील पौरोहित्य करणारे), ज्योतकर (नंदादीप लावणारे),

पुराणिक, हरिदास, काटकार (वेत्रधार), पंचवाद्यें वाजविणारे, चौघडेवाले, मशाल धरणारे, शिपाई, कलावंतिणी, भावीण, दिवे लावणारे, शिवाय सोनार, सुतार, लोहार, परीट, कासार, बुरुड इत्यादि नोकरवर्ग आहे.

वत्स व कौंडिण्यगोत्री कुशस्थळीकर

लाड, केडारी, शिंगणदळवी, कंठक, ब्रह्मे, भिसे, नेत्रावळकर, तिनईकर, तेलंग, केंकरे, नाईक कोळंबे, धुमे, नाईक हिंगरे, नाईक संझगिरी हे वत्स गोत्री आहेत.

भांडारी, सत्यवंत भांडारी, दळवी, राजाध्यक्ष, पालेकर, कैसरे, वागळे, भेंडे, नाईक मांयकर, काबाडी हे कौंडिण्य गोत्री आहेत.

वरील उपनामांतूनच आणखी बरींचशीं उपनामें निघालीं आहेत. त्यांपैकींच दुभाषी, काकोडकर, नाडकर्णी, देशपांडे, रांगणेकर, गुडे, वाघ, रेडकर इत्यादि उपनामें आहेत. तीं या मूळ चोवीस नांवांतूनच निघालेलीं आहेत.

पालवी देवी ·

एखाद्याची कुलदेवता असते त्याप्रमाणेंच अन्य कांहीं देवताहि असतात. जसें इष्टदेवता, आराध्यदेवता, ग्रामदेव, स्थानदेव. त्याचप्रमाणें येथें कुलदेवतेशिवाय एक पालवी देवी म्हणून असते. वरील मूळ चोवीस उपनांवांपैकीं कित्येकांची पालवी श्रीम्हाळसा म्हाडदोळ तर कांहींची बांदिवडें येथील श्रीमहालक्ष्मी आहे. पालवी देवी म्हणजे एकप्रकारें इष्टदेवताच.

कुलदैवताचें दर्शन, पूजा, अभिषेक, नैवेद्य केल्यावर या पालवी देवीचीहि यथाशक्ती सेवा करावी लागते; अन्यथा श्रीमंगेशदेवाचा प्रसाद (कौल) होतच नाहीं. जेव्हां पालवी देवीचें दर्शन, अभिषेक, नैवेद्य करावा तेव्हांच श्रीमंगेश महाजनास घरीं परत जाण्याकरितां कौल देतो.

श्रीमंगेश संस्थानांतील देवकृत्यें

श्रीमंगेश देवस्थानांतील देवकृत्यांचे प्रकार अनेक आहेत. आणि त्याचा बारीकसारीक तपशीलहि अगदीं ठरलेला आहे. त्याची ही यादीच पहा.

( १ ) धूळभेट : श्रीमंगेशदेवास नारळ, ग्रामपुरुषास आणि मुळकेश्वरास केळें. (२) गांठवळ : दंपत्यस्नान. लग्न झाल्यावर एकदांच हें स्नान तलावावर करतात. (३) पंचामृतासह आवर्तन. (४) अभिषेक-नैवेद्य. (५) पंचामृतासह एकादष्णी. (६) श्रीग्रामपुरुषास पायस व मुळकेश्वरास खिचडी. (७) ब्राह्मण-सुवासिनी भोजन. (८) मुळकेश्वरास तंबाकूची विडी (मुळकेश्वर म्हणजे देवशर्मा गुराखी). (९) मुळकेश्वरास कांबळ-कोयता. (१०) कालभैरवास वड्यांची माळ. (११) घूड भरणें : गाभाऱ्यांत श्रीचें शिवलिंग बुडेपर्यंत पाणी सांठविणें. (१२) लघुरुद्र. (१३) शिंगांचा लघुरुद्र : यावेळीं अकरा ब्राह्मण रानमहिषाच्या शिंगांनीं देवावर धार धारतात. (१४) महारुद्र. (१५) शिंगांचा महारुद्र. (१६) एकदारी पूजा : केळ सोलून त्याचा चतुष्कोन करून त्यास त्याचीच कमान करणें. (१७) तीनदारी पूजा. (१८) श्रीकौंडिण्य-पुरुषास अभिषेक. (१९) तुलाभार : आपल्या वजनाच्या संकल्पित जिनसा श्रीस अर्पण करणें—नारळ, साखर, गूळ इत्यादि.

या सर्व देवकृत्यांची पावती कमेटी कचेरीमधून घ्यावयाची असते. पावती लिहिल्यानंतर त्या त्या कृत्यांची संबंधित नोकरांना सूचना दिली जाते. त्या त्याप्रमाणें संबंधित नोकर योग्य वेळीं उपस्थित राहून आदरानें आणि श्रद्धेनें आपापलीं कामें योग्य प्रकारें करतात. हीं कामें ते करत असतांना त्यांची वृत्ती पूर्ण समाधानाची दिसते. इतर तीर्थक्षेत्रावरील क्षेत्रोपोध्यायांची वृत्ति गोमंतकांतील कोणत्याहि देवस्थानांत आढळून येणार नाहीं. गोमंतकांत अशीं कितीतरी मंदिरें आजच्या काळांतहि वैभवानें नांदत आहेत. विशेषतः

फोंडे महालाला फोंडे महाल न म्हणतां ' देऊळ महाल ' म्हटलें तरी चालण्यासारखें आहे; कारण तो महाल देवळांनींच नटलेला आहे. याच महालांत सर्व मंदिरें येण्याचें कारण हा प्रांत बाटाबाटीच्या काळीं सौंधेकरांच्या ताब्यांत होता.

## फोंडामहाल पक्व फळासारखा फिरंग्याच्या तोंडीं

मराठ्यांचा व सौंधेकरांचा संरक्षक तह झाला होता म्हणून सौंधेकर राजानें बराच काळ सुखानें राज्य केलें. पुढें सौंधेकरांची मूळची राजधानी कर्नाटकांतील शिरसी सौंधा, त्यावर हैदरअलीची दृष्टी गेली आणि त्यानें सैन्याची जमवाजमव चालविलेली पाहून ठरलेल्या करारान्वयें सौंधेकरांनीं मराठ्यांपाशीं कुमक मागितली. पण दुर्दैवानें मराठ्यांकडून सौंधेकरांस मदत मिळण्याचीं चिन्हें दिसेनात. तेव्हां सौंधेकरांनीं गोव्यांतील फिरंग्याकडे मदतीकरितां तोंड वेंगाडलें. पोर्तुगिजांनीं त्या वेळीं सौंधेकरांना सहानुभूती दाखवून चार गोष्टी सांगण्यापलीकडे कांहीं केलें नाहीं. त्या गोष्टींपैकीं एक म्हणजे–' हा मजकूर आम्ही पोर्तुगालला कळवूं आणि तेथून सैन्य आणूं. ' पण हैदरअलीला पोर्तुगिजांच्या सैन्याबरोबर लढण्याकरितां काळाला पुढें जाऊं देण्याइतका दम कुठें होता ! त्यानें चुटकीसरशीं सौंधा काबीज केला. तेव्हां सौंधेकरांची स्थिती यावेळीं फारच केविलवाणी झाली. सौंधा तर हातचा गेलाच, राहिलेला मुलुख तरी हैदराच्या घशांत जाऊं नये म्हणून त्यांनीं तो राहिलेला मुलुख म्हणजे अंतरूज पंचमहालापासून कारवारांतील सदाशिवगडचे नंदीपर्यंतचा भाग पोर्तुगिजांच्या स्वाधीन आपल्या हातांनीं केला. आणि त्याच वेळीं असा करार केला कीं, सौंधे येथील गादी परत सौंधेकरांच्या हातीं येतांच हा सर्वच्या सर्व मुलुख पोर्तुगिजांनीं सौंधेकरांना परत करावा. तोंपर्यंत दरसाल ३०००० रुपये सौंधेकरांस पोर्तुगिजांनीं खंडणी म्हणून द्यावी.

पुढें या खंडणींतील एक शून्य कमी होऊन मागील आंकडाहि घटला. आणि शेवटीं फक्त सहा हजारच उरले !

हैदरअल्लीच्या भयानें अंतरूज पंचमहाल हा पोर्तुगिजांच्या ताब्यांत गेला तो कायमचाच. बोका मागें लागल्यानें उंदरानें नागाच्या फणीचा आश्रय घ्यावा म्हणजे त्या उंदराची जशी शेवटीं ठरलेलीच अवस्था व्हावी तीच अवस्था सौंधेकरांच्या अंतरूज प्रांताची झाली.

## अलीकडच्या काळातील घडामोडी

अंतरूज प्रांत अशा प्रकारें पोर्तुगीजांच्या ताब्यांत गेला. हिंदु लोकांचीं धाबीं दणाणलीं. सासष्टींतील धुमाकुळाचीं दृश्यें डोळ्यांसमोर नाचूं लागलीं. पण अंतरूजची सासष्टी झाली नाहीं; कारण पाद्र्यांनीं सासष्टींत घातलेल्या हैदोसाचा परिणाम असा झाला कीं, तीं स्थळें दग्धभूसारखीं झालीं आणि पोर्तुगिज अधिकाऱ्यांचे डोळे उघडले. त्यामुळेंच अंतरूज प्रांत पोर्तुगिजांच्या ताब्यांत येतांच त्यांनीं, तेथील लोकांनीं घाबरण्याचें कारण नाहीं, सासष्टींतील पुनरावृत्ति अंतरूजमध्यें होणार नाहीं, अशा अर्थाचे जाहीरनामे आवृत्त्यावर आवृत्त्या काढून भराभर फडकविले. आणि हिंदूंच्या मंदिरांना तिथें स्थैर्य लाभून तीं दिवसेंदिवस वैभवाचें शिखर गांठूं लागलीं.

५ ऑक्टोबर १९१० ला पोर्तुगॉल प्रजासत्ताक बनलें, त्यामुळें पोर्तुगिज नागाच्या धर्मच्छलाची फणा हळूहळू दूर होऊं लागली. आणि तिसवाडी, अंतरूज वगैरे कांहीं भागांतील पूर्वीं जुलुमानें बाटवून ख्रिस्ती केलेल्यांची शुद्धी होऊन ते परत हिंदु होऊं शकले.

गोमंतकांतील कोणत्याहि देवस्थानाचा इतिहास लिहावयाचा झाला तर तो बाटाबाटीच्या काळ्या रंगाशिवाय लिहितां येणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]

हा प्रचंड बाटाबाटीचा डोंब महाप्रलयाला सुद्धां आपल्या पोटीं लपवितां येणार नाहीं !

गोमंतकांतील देवस्थानांचा इतिहास भूतकाळानें अशा प्रकारें रंगविला; वर्तमानकाळ किंकर्तव्यमूढ होऊन बसला होता; भविष्यकाळानें मात्र साडेचारशें वर्षें गोमंतकावर पसरलेल्या काळ्या साम्राज्यशाहीचा डाग धुवून काढून गोमंतकाचा इतिहास दूधसागराप्रमाणेंच धवळ करण्याचें पसायदान श्रीमंगेशाकडून सार्थ करून घेतलें.

### कैवल्य मठाधीशांची परंपरा

सासष्टी प्रांतांत फिरंग्यांच्या बाटाबाटीच्या आगींत जशीं हिंदूंचीं पवित्र मंदिरें नष्ट झालीं त्याचबरोबर सामान्य माणसाचें जीवनहि धोक्यांत आलें. प्रत्येक हिंदु ‘ मला हिंदु राहूनच कुठें जगतां येईल ’ याचा विचार करूं लागला. आणि त्या दृष्टीनें जिथें त्याला सुरक्षितता वाटली त्या ठिकाणीं तो आपलें कुटुंब घेऊन गेला. याच वेळीं कुशस्थळींत केळोशीचे आणि कुशस्थळीकरांचे धर्मगुरु रहात होते. त्यांचें नांव श्रीसदानंदस्वामी असें होतें. स्वामींनीं पाहिलें कीं फिरंग्यांच्या या बाटाबाटीच्या आगींत जिथें सर्व हिंदु सर्पसत्रांतील सर्पांप्रमाणें अग्नीची आहुति बनत आहेत तिथें हिंदूंच्या धर्मगुरूंची काय स्थिती होईल ! त्यांनींहि पण गोवा सोडला आणि गोवा प्रांताच्या आसपास ते प्रथम गोळवण, चित्रर वगैरे मठांत कांहीं काळ राहिले. सासष्टींतील देवस्थाना-बरोबर हा मठहि उध्वस्त झाला. मठामध्यें असलेले कागदपत्र आणि इतर महत्त्वाचे लेख—तें ‘ जादुगिरीचें लिखाण ’ समजून पाद्र्यांनीं त्यांची होळी केली !

बराच काळ झाला तरी गोव्यांत पूर्ववत् स्वस्थता होण्याचीं चिन्हें दिसेनात. शेवटीं श्रीसदानंदस्वामी पुण्यक्षेत्र काशी येथें जाऊन राहिले. पुढें कांहीं वर्षांनीं म्हणजे साठ-पासष्ट वर्षांनीं गोव्यामध्यें

फिरंग्यांचीं राक्षसी कृत्यें थांबून शांतता निर्माण झाली. हिंदूंच्या मंदिरांनीं गोव्याच्या भूमींत पुनः आपलें आसन दृढ केलें. त्यावेळीं केळोशीकर आणि कुशस्थळीकर यांना उपदेशाकरितां परंपरागत धर्मगुरूंची आवश्यकता वाटली आणि त्यांचा शोध त्यांनीं केला. शोधाअंतीं त्यांना असें समजलें कीं, ( ६१ ) श्रीसदानंदस्वामींचे शिष्य ( ६२ ) श्रीमत् भावानंदसरस्वती श्रीकाशीक्षेत्रीं असतात तेच आपले परंपरागत धर्मगुरु आहेत. असें समजून आल्यावर त्यांना त्यांनीं गोवाप्रांतीं श्रीशांतादुर्गा-कवळें येथें येऊन रहाण्याची विनंति केली. पण श्रीमत् भावानंद यांनीं " काशी सोडून मी कुठेंहि जाणार नाहीं " असें सांगितलें. ते स्वतः गोमंतकांत न येतां श्रीसच्चिदानंद सरस्वती या स्वशिष्यास गोमंतकस्थ शिष्यवराला उपदेशदीक्षादानाचा अधिकार देऊन त्यांनीं पाठविलें. याच्याच परंपरेंतील स्वामी सध्यां कवळें येथील मठांत असतात. गोव्यांतील श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा आणि अन्य देवस्थानांतहि त्याचा बहुमान केला जातो. श्रीमंगेशाच्या माघांतील जत्रेस श्रीस्वामी महाराज उपस्थित रहातात. त्या वेळीं सर्व सरंजामानिशीं त्यांची पाद्यपूजा करण्यांत येते. हा मठ श्रीगौडपादाचार्यांच्या परंपरेंतला आहे.

गौडपरंपरेंतील गोविंदयतींचे जे मुख्य शिष्य श्रीविवरणाचार्य यांच्यापासून निघालेली जी शाखा तीच कैवल्य मठाधीशांची होय.

कैवल्यपूरस्वामींचे अन्य ठिकाणींहि गोमंतकांत आणि गोमंतकाबाहेरहि मठ आहेत. गोमंतकांत सांखळी आणि गोमंतकाबाहेर सावंतवाडी, मुंबई, खानापूर, नाशिक, ब्रह्मावर्त आणि गोकर्ण येथें मठ आहेत. गोकर्ण येथील मठांत ज्या चक्रवर्तीश्वर लिंगाची स्थापना केली आहे, त्या चक्रवर्तीश्वर लिंगाचा इतिहास फार उद्बोधक वाटतो.

## चक्रवर्तीश्वर लिंगाचा इतिहास

अमेरिका खंडांत फिलाडेल्फिया शहरीं एकदां सर्व देशांतील

वस्तूंचें प्रदर्शन भरलें होतें. त्यावेळीं कलकत्त्याहून एक सुंदर संगमरवरी शिवलिंग तिकडे पाठविलें होतें. तिकडच्या व्यवस्थापकांना त्या लिंगाचें उघड रीतीनें प्रदर्शन करणें अनुचित वाटल्यावरून तें त्या प्रदर्शनालयांतून काढून त्यांनीं अंगणांत टाकलें. पुढें लंडन शहरांत केनसिंगटन भागांत सन १८८६ सालीं असेंच प्रदर्शन भरलें तेथें हें लिंग पाठविलें गेलें. तेथील व्यवस्थापकांना अमेरिकन लोकां-प्रमाणेंच प्रदर्शनांत तें ठेवणें अनुचित वाटल्यावरून त्यांनीं तें तेथून काढून टाकलें आणि तें फोडून खडीच्या उपयोगास लावण्याचा विचार झाला! मुंबई गव्हर्नरच्या कौन्सिलमध्यें काम करीत असलेले सर जॉर्ज बर्डवुड हे तेव्हां नुकतेच हिंदुस्थान सोडून तेथें गेलें होते. त्यांना ही गोष्ट समजतांच त्यांनीं तें लिंग तेथून उचलून आपल्या कचेरींत ठेवलें; त्याला रुद्राक्षाची माळ घातली आणि वर झुंबर टांगून ठेवला. मुंबई हायकोर्टाचे सुप्रसिद्ध वकील कै. घनश्याम नीलकंठ नाडकर्णी हे १८९६ सालीं युरोपच्या प्रवासास गेले असतां लंडन येथें त्यांची आणि सर जॉर्ज बर्डवुड यांच्याशीं गांठ पडली. त्या भेटींत हें लिंग परत हिंदुस्थानांत नेण्याची विनंती बर्डवुडनीं केली. पुढें हें शिवलिंग १८९७ मध्यें आक्टोबर महिन्यांत श्रीमठ खानपूर येथें येऊन दाखल झालें.

पुढें या श्रीचक्रवर्तीश्वर लिंगाची स्थापना श्रीमत् पूर्णानंद सरस्वती यांच्या हस्तें गोकर्ण मठांत फाल्गुन शु. १० मी (ता. २९ फेब्रुवारी स. १९२०) रोजीं झाली.

श्रीनाईकस्वामी :

नाईकस्वामी या नांवाचे प्रसिद्ध साधुपुरुष या श्रीमंगेश देव-स्थानांत बरींच वर्षें रहात असत. श्रीमंगेशाचे ते परमभक्त होते. हे साक्षात्कारी पुरुष मूळचे कारवार जिल्ह्यांतील अंत्रवली गांवचे. यांचें नांव मंगेश शंकर नाईक करंडे देसाई असें होतें.

एकदां ते आपल्या कुटुंबासह कुलदेव श्रीमंगेशाच्या दर्शनास निघाले. जुन्या काळीं आत्तांच्यासारखी वाहनाची सोय नव्हती. कांहीं ठिकाणीं पायींच प्रवास करावा लागे. काणकोणच्या जंगलांत जेव्हां ते आले त्या वेळीं त्यांना पायींच प्रवास करावा लागला. त्या घनदाट जंगलांत त्यांची व त्यांच्या कुटुंबाची चुकामूक झाली. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांनीं कुटुंबाचा शोध केला; पण कांहीं पत्ता लागेना. शेवटीं संध्याकाळ झाली. सूर्य डोंगराच्या रांगेमागें लपूं लागला. तेव्हां विषण्ण स्थितींत हे गृहस्थ एका दगडावर बसले आणि श्रीमंगेशाचा धांवा करून म्हणाले, " मंगेशा आतां तूंच त्राता ! " तेवढ्यांत त्यांच्या-समोर एक अवधूतवेषधारी संन्यासी येऊन त्यांना म्हणाला, " या भवारण्यांत जन्मोजन्मीं तूं वाट चुकतो आहेस त्याबद्दल तूं कधींच दुःख केलें नाहींस तें ? " या संन्याशाच्या वचनानें नाईक यांना उपरति झाली. तिथेंच त्यांच्या मंडळींची आणि त्यांची भेट झाली, पण संन्या-शांच्या वचनाचा त्यांच्या मनावर पगडा बसला तो कायमचाच.

ते मंगेशीं आले आणि मंगेशाच्या सेवेंतच विरक्त स्थितींत राहूं लागले. त्यांची निष्काम, अखंड अशी मंगेशसेवा महाजनांनीं पाहिली आणि त्यांचा सर्व खर्च संस्थानांतून चालावा अशी व्यवस्था त्यांनीं केली.

श्रीमंगेशाच्या सेवेंतच त्यांनीं आपलें राहिलेलें आयुष्य घालविलें आणि शेवटीं ते श्रीमंगेशाच्याच चरणीं विलीन झाले.

नाईकस्वामी यांच्या समाधीची जागा देवस्थानच्या समोरच वनभोजनाची जी शाला आहे तिच्यामागें आहे.

नाईकस्वामी हे एक उत्तमपैकीं कवि होते. जें कांहीं त्यांनीं काव्य केलें तें श्रीमंगेशाच्या स्तुतीचेंच. त्यांनीं रचलेल्या काव्यापैकीं आज फक्त ' झुलवे ' काव्य तेवढें उपलब्ध आहे. श्रीमंगेशाच्या पालखी-च्यावेळीं प्रत्येक पेण्याच्या ( पालखी थांबण्याचा टप्पा ) वेळीं कलावंतिणी

हें काव्य म्हणतात. या काव्यछंदाला 'झुलवा' असें नांव आहे. हे झुलवे एकंदर सोळा आहेत. त्यापैकीं कांहीं असे आहेत :

हरहर मंगेश्वर तनुकुशपुरनाथा ।
हरहर विश्वंभरा सुखदाता ॥
हरहर तापत्रयभवछेत्ता ।
हरहर गाइन शिबिकोत्सव गुणनाथा ॥ १ ॥

प्रथम पदांगुष्ठाधार अग्नी ।
ध्याता तेजोमय स्वप्नभाव नेत्रीं ॥
दृश्य द्रष्टा दर्शन त्रिपुटी सूत्रीं ।
दृष्टी स्थिरता पावे चित्रविचित्रीं ॥ २ ॥

अवलष्टाले [illegible]ारअशेष ।
करुणाचक्षुम् गुरुपाद रक्ष ॥
धरिता परशिव तत्वय शेषा रक्ष ।
पूर्ण झाला श्रीमगेशीं मगेश ॥ ३ ॥

पार्वतीपति शिवहर महादेवच दुष्टाच्या संहारासाठीं गोमंतकांत येऊन राहिले. त्या स्थळाच्या दर्शनाची आपल्यापैकीं प्रत्येकालाच उत्कंठा लागलेली असणार. तो सुयोग प्रत्येकाला लवकर येवो असेंच त्या श्रीमंगेशाच्या चरणीं आपण प्रार्थू या; आणि घोष करूं या— "पार्वतीपते ! हरहर महादेव."

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

# संस्कृत साहित्य सरिता

## संस्कृत भाषेंतील प्रसिद्ध काव्य-नाटकांचें

## मराठी सुबोध कथासार : प्रत्येकीं ३२ पानांत

सुभाषितांसह दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : १
११. दशकुमारचरित २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानन्द
१७. पंचरात्र
१८. रत्नावलि
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. ऊरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय—नैषध

विद्यार्थी, नवशिक्षित, अल्पशिक्षित व सामान्य वाचकवर्ग यासाठीं

**३२ पानांचें एक पुस्तक : प्रत्येकीं ३७ न. पैसे : पुठ्ठ्याच्या मजबूत**

**पेटींतून विविध रंगी बत्तीस पुस्तकें एकत्र : १२ रुपये फक्त.**

* * * सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-माला : पांच संच : रु. २०.२४

# सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

सहा पु. : प्र. ६० न.पै. — संच १ ला : रु. ३-६०

१. सुंदर तें ध्यान : पंढरपूरचा पांडुरंग
२. जय जय रघुवीर समर्थ : समर्थांचा सज्जनगड
३. ज्ञानोबा माउली . ज्ञानदेवाची आळंदी
४. एका जनार्दनी : एकनाथाचें पैठण
५. मल्हारी मार्तंड : जेजुरीचा खंडोबा
६. तुका झालासे कळस : तुकारामाचें देहू

सहा पु. · प्र.६२न.पै. — संच २ रा रु.३-७२

१. श्रीगोंदे, भवताप हरी ! : त्र्यंबकेश्वर; नाशिक
२. मंगलमूर्ति मोरया : मोरया गोसाव्याचें चिंचवड
३. जय जगदंब · कोल्हापूरची अंबाबाई
४. श्रीगुरुदेव दत्त : नरसोबाची वाडी, औदुंबर
५. जय भवानी ! : तुळजापूरची भवानी
६. माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें : नेवासें

सहा पु. : प्र.६२न.पै. — संच ३ रा रु. ३-७२

१. गोमंतकाची शांतिशक्ति : शांतादुर्गा ( कवळें )
२. पार्वतीपते ! हर हर महादेव : श्रीमंगेश
३. ' डाकिन्याम् भीमशंकरम् ' भीमाशंकर
४ दलितांचा कैवारी भार्गवराम : परशुराम
५. छत्रपतींचें कुलदैवत : शिखर शिंगणापूर
६. श्रीगुरूंचें गंधर्वपूर · गाणगापूर

आठ पुस्तकें : प्र.६५न.पै. — संच ४ था · रु. ५-२०

१ मंदिरमाला मुक्तागिरी . मुक्तागिरी
२. इथें टेकले श्रीराम : रामटेक
३. ' उदयोऽस्तु अम्बे ! ' अमरावती
४. विदर्भ-पंढरी : कौंडण्यपूर
५. अगस्त्यांचें संस्कृति-केंद्र : सालबर्डी
६. चन्द्रपूरची महाकाली · चन्द्रपूर
७.
८.

सहा पुस्तकें प्र. ६५न.पै. — संच ५ वा · रु. ४-००

१. REFBK-0012993 हूर
२.
३. योगेश्वरीचें माहेर : आम्बेजोगाई ( ७५ नये पैसे )
४. ' परल्यां वैद्यनाथं ' च : परळी वैजनाथ
५. ' नागेशं दारुकावने ' : औंढ्या नागनाथ
६. दक्षिणद्वार देवगिरी दौलताबाद

*महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केन्द्रांचीं*
*ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं*
*भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें*

**गोमंतकाची शांति-शक्ति** * १३ *
कवळ्याची शांतादुर्गा : वा. ल. वझे

**पार्वतीपते ! हर हर महादेव** * १४ *
गोमंतकाचा श्रीमंगेश : वा. ल. वझे

**'डाकिन्याम् भीमाशंकरम्'** * १५ *
भीमाशंकर क्षेत्र : शं. ना. जोशी

**दलितांचा कैवारी भार्गवराम** * १६ *
कोंकणचें परशुराम क्षेत्र स. आ. जोगळेकर

**छत्रपतींचें कुलदैवत** * १७ *
शिखर शिंगणापूर : चिं. ग. कर्वे

**श्रीगुरूंचें गंधर्वपूर** * १८ *
श्रीक्षेत्र गाणगापूर रा. चिं. ढेरे

...अशीं आणखी कितीतरी पुस्तकें
आम्हीं आपल्या हातीं देणार आहोंत
त्यांपैकीं वरील सहांचा हा तिसरा संच

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

**प्रत्येक पुस्तकाची किंमत ६२ नये पैसे**
**सहा पुस्तकांची संच-पेटी : रुपये ३·७२**

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

**व्होरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.**
३, राउंड बिल्डिंग, काळबादेवी, मुंबई २.